नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/03/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## सुगंधीत तुंबाखूच्या अवैध साठयावर धाड सुमारे 1500 किलो सुगंधीत तंबाखू जप्त
## (स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीस पथकाची कार्यवाही)

स्था.गु.शा. :– दि. 09/03/2021 रोजी मौजा मांढळ पोस्टे कुही अंतर्गत दोन वेगवेगळया ठिकाणी अवैधरित्या सुंगधीत तंबाखूचा साठा साठवून ठेवलेला आहे अशी बातमी गस्तीवर असनाऱ्या नागपूर ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाला प्राप्त झाली. सदर खबरेची माहिती श्री अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक, स्थागुशा यांना देवून त्यांचे मार्गदर्शनात मिळालेल्या माहितीवरुन तातडीने कायदेशिर कार्यवाही करणेकामी स्थानिक पंचाना पाचारण केले व पंचासमक्ष नामे सलीम उर्फ पप्पू शेख याने किरायाने घेतलेल्या लक्ष्मण पवार वार्ड क्र. 5 मांढळ याचे घरी महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या सुगंधीत तंबाखूचे कार्यवाही कामी धाड घातली असता नमुद ठिकाणी मोठया प्रमाणावर ईगल, विराट, मजा अशा बॅन्डचा मानवी जिवनास अपायकारक असलेला सुंगधीत तंबाखू मिळून आला. त्याचप्रमाणे मांढळ येथीलच वार्ड क्र. 4 येथे राहणारे राजहंस शिंदूरकर याचे घरी धाड टाकली असता सदर ठिकाणी इगल, विराट, क्रेज, रिमझीम, गोल्डन सफार अश्या विवीध ब्रॅन्डचा सुंगधीत तंबाखूचा साठा मोठया प्रमाणावर मिळून आला. दोन्ही ठिकाणी एकुण 6,33,570/– रुपये किंमतीचा सुमारे 1500 किलोग्रॅम सुंगधीत तंबाखू साठा मिळून आल्याने आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आला. आरोपी नामे 1) सलीम उर्फ पप्पू सुभान शेख वय 36 वर्ष, रा. मांढळ 2) अरुण उर्फ अर्जुन हरिश्चंद्र कटारिया वय 29 वर्ष, रा. उमरेड आणि 3) राजहंस रतन शिंदुरकर वय 45 वर्ष रा. मांढळ यांना ताब्यात घेवून पो.स्टे. कुही येथे आरोपितांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपितांविरुध्द दाखल गुन्हयातील त्यांचा आनखी एक साथीदार आरोपी नामे अजय बन्सल, वय अं. 40 वर्ष रा. उमरेड हा फरार झाला स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस पथक आणि पोलीस स्टेशन कुही यांचेकडून आरोपीचा शोध सुरु आहे. पुढील तपास पो.स्टे. कुही येथुन करण्यात येत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार सहा. पोलीस निरीक्षक जितेन्द्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेन्द्र गौरखेडे, सहा.फौज. बाबा केचे, पोलीस हवालदार रमेश भोयर, संतोष पंधरे, राजेन्द्र सनोडिया, विनोद काळे, पोलीस शिपाई राध्येशाम कांबळे, अजीज दुधकनोज, बालाजी साखरे, चालक पोलीस हवालदार भाऊराव खंडाते आणि पोलीस नायक अमोल कुथे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर